पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ योजनेच्या जाहिरात प्रसिध्दीसाठी माध्यम आराखडा राबविण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार विभाग
शासन निर्णय क्र.कृकमा.०५२६/प्र.क्र.९३/२-स
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २९ जुलै, २०२६

संदर्भ :- १) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. मावज.२०२१/प्र.क्र.१२६/का.३४, दि.१३.०८.२०२१
२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्र. कृकमा ०६२६/प्र. क्र.९३/२-स, दि. ०२.०६.२०२६
३) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांचेकडील माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीच्या दि. १६.०६.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त
४) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. मावज.२०२६/प्र.क्र.४२/मावज, दि.०७.०७.२०२६

प्रस्तावना -:

संदर्भीय क्र. २ मधील शासन निर्णयान्वये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ जाहिर करण्यात आली आहे. सदर योजनेची प्रचार, प्रसार व प्रसिध्दी करण्यासाठी तसेच योजनेची अंमलबजावणी लाभार्थी पुरक व पारदर्शीप्रमाणे करण्यासाठी वर्तमानपत्रातून योजनेची व्यापक प्रसिध्दी करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयने संदर्भ क्र. ३ अन्वये सदर योजनेच्या जाहिरात प्रसिध्दीकरीता तयार केलेल्या माध्यम आराखड्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ या योजनेकरीता माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत माध्यम आराखडा राबविण्यास (Media Plan) व त्याकरीता येणाऱ्या रु. ९,९९,७८,८००/- (अक्षरी रुपये नऊ कोटी नव्याण्णव लाख अठ्याहत्तर हजार आठशे) (सर्व करासह) इतक्या खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर माध्यम आराखडा अंतर्गत राबवावयाच्या उपक्रमांचा तपशिल या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट **"अ"** मध्ये नमूद करण्यात आला आहे.

२. सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद माध्यम आराखड्यानुसार जाहिरात प्रसिध्दीची कार्यवाही माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने सहकार विभागाच्या समन्वयाने करावी. तसेच, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने सदर जाहिरात प्रसिध्दीची कार्यवाही माध्यम आराखडा समितीच्या निर्णयानुसार तसेच प्रचलित नियमानुसार व विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन करावी.

३. प्रचार व प्रसिध्दीसाठी मिडीया प्लॅनिंग करणे, दृकश्राव्य व श्राव्य जाहिरातीचे क्रिएटिव्ह त्याचप्रमाणे बाह्य माध्यमांच्या (उदा. होर्डिंग) प्रसिध्दीचा मजकूर अंतिम करण्याची कार्यवाही नियमानुसार करण्यात यावी.

४. विविध माध्यमांच्या व्दारे जाहिरात प्रसिध्दी प्रचलित नियम, कार्यपध्दती यानुसार पार पाडण्यासाठी जबाबदारी संबंधित संस्थेची राहील. प्रसिध्दी करण्यात येणाऱ्या जाहिरातीचे संनियंत्रण व पर्यवेक्षण सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांनी करावे.

५. प्रस्तुत जाहिरात प्रसिध्दीबाबत देयके सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचे नावे सादर करण्यात यावीत. त्यानुषंगाने आराखडयानुसार त्या त्या माध्यमाव्दारे प्रसिध्द झाल्याबाबत संबंधित एजन्सीने माहिती (उदा. जिओ टॅग फोटो, टेलिकास्ट सर्टिफिकेट, कॉल लॉग्स इ.) सादर करावी. तद्नंतर याबाबत प्रचलित नियमानुसार पडताळणी करुन संबंधितांची देयके अदा करण्याची कार्यवाही सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांच्यामार्फत करण्यात येईल.

६. प्रस्तुत प्रकरणी येणारा खर्च हा सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता सदर खर्च मागणी क्रमांक व्ही-०२, २४३५-इतर कृषि विषयक कार्यक्रम (६०) इतर (१०१) शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्ती योजना (००) (०७) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ (२४३५ ०२४२), ३३ अर्थसहाय्य (दत्तमत) या लेखाशिर्षाखालील उपलब्ध केलेल्या तरतूदीमधून भागविण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय, नियोजन विभाग अनौपचारीक संदर्भ क्र. २१२/२०२६/का.१४३१, दि. १७.०७.२०२६ व वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्रमांक ४७३/२०२६/व्यय-२ दिनांक २४.०७.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०७२९१९२०११५९४७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANTOSH ARUN PATIL

Digitally signed by SANTOSH ARUN PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=CA78467BCC4594E1E11741A7962A7A83FEAFB17644257 5037160FC343C4AE5AB, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E52439642AB57C332B2A3E3E46F0D907BA6167409 EF6D52C943BF775ECF042FD, cn=SANTOSH ARUN PATIL
Date: 2026.07.29 19:24:58 +05'30'

(संतोष पाटील)
अपर निबंधक तथा सहसचिव,
महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
३) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
५) महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा) महाराष्ट्र-२, मुंबई.
६) अधिदान व लेखा अधिकारी, पुणे.

७) निवासी व लेखापरिक्षा अधिकारी, पुणे.
८) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व).
९) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).
१०) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).
११) वित्त विभाग (अर्थसंकल्प-१३/ व्यय-२), / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) अवर सचिव (कार्यासन १७-स), सहकार, पणन वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.

शासन निर्णय क्र.कृकमा.०५२६/प्र.क्र.९३/का.२-स, दि.२९.०७.२०२६

परिशिष्ट-अ

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ च्या व्यापक प्रसिध्दीकरीता प्रस्तावित अंदाजित माध्यम आराखडा								
अ.क्र.	माध्यम	स्वरुप	तपशिल	रक्कम (प्रती नग)	संख्या	एकूण अंदाजित रक्कम	जीएसटी	एकूण अंदाजित रक्कम (सर्व करासहित)
१	निर्मिती साहित्य (Production of Creative)	प्रिंट	प्रिंट आणि इतर बाह्य माध्यमांकरीता जाहिरातीचा मजकूर (Adaptation, Translation, Formatting from one media to other media)	१०,०००	१०	१००,०००	१८,०००	१,१८०००
		टिव्हीसी	TVC-१० ६० Sec-As per DAVP rate	५,७६,०००	५	२८,८०,०००	५,१८,४००	३३,९८,४००
		लघुपट निर्मिती	As per DAVP rate २ मिनिटे	८,३२,०००	२	१६,६४,०००	२,९९,५२०	१९,६३,५२०
		यशोगाथा निर्मिती	As per DAVP rate २ मिनिटे	८,३२,०००	५	४१,६०,०००	७,४८,८००	४९,०८,८००
		जिंगल्स / स्पॉट	Audio Jingle (१० ते ३० सेकंद) As per DAVP rate	४५,०००	१	४५,०००	८,१००	५३,१००
	एकूण (अ)					**८८,४९,०००**	**१५,९२,८२०**	**१,०४,४१,८२०**
क्र.	Media	मूळ दर, प्रक्रिया	Details	वारंवारिता	संख्या/ दिवस	एकूण अंदाजित रक्कम	जीएसटी	एकूण अंदाजित रक्कम (सर्व करासहित)
	मुद्रित माध्यमे (जाहिरात शाखा)							
१	वृत्तपत्रामधून प्रसिध्दी	शासनमान्य दर	राज्यातील मोठे / मध्यम लघु संवर्गातील निवडक वृत्तपत्रामधुन पुर्ण पान / अर्ध पान / पाव पान जाहिरातीव्दारे	नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत	१ दिवस	२,००,००,०००	१०,००,०००	२,१०,००,०००

इलेक्ट्रॉनिक दकश्राव्ये माध्यम (वृत्तचित्र शाखा)								
१	दुरदर्शन	केंद्र सरकारचा दर	टिव्हीसीचे प्रसारण-सांय. ७.०० बातम्यांच्यापुर्वी व मध्यंतरात जाहिरात प्रसारण	नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत	३० दिवस	१०,००,०००	१,८०,०००	११,८०,०००
२	आकाशवाणी केंद्र	केंद्र सरकारचा दर	जिंगल्स/ स्पॉटचे सकाळी ७.१० आणि सायंकाळी ७ वाजता बातम्यांच्या मध्यंतरात एक वेळा (केंद्र शासनाचे दर)	नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत	३० दिवस	१५,००,०००	२,७०,०००	१७,७०,०००
३	वृत्त वाहिन्याव्दारे (News Channels) प्रसारण	CBC (DAVP) यादिवरील व दर	१० ते ६० सेकंद जाहिरातीचे प्रसारण-प्रत्येक बँडमध्ये नमूद दराच्या मर्यादेत समसमान जाहिरात प्रसारण	नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत	३० दिवस	३५,००,०००	६,३०,०००	४१,३०,०००
४	मराठी मनोजरनात्मक वाहिन्यावरुन (Ent. Channels) जिंगल/ स्पाटचे प्रसारण	CBC (DAVP) यादिवरील व दर	१० ते ६० सेकंद जाहिरातीचे प्रसारण-प्रत्येक बँडमध्ये नमूद दराच्या मर्यादेत समसमान जाहिरात प्रसारण	नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत	३० दिवस	४३,००,०००	७,७४,०००	५०,७४,०००
५	राज्यातील एफ एम वाहिन्यावरुन (Private FM Radio Channels)	CBC (DAVP) यादिवरील व दर	१० ते ६० सेकंदाच्या जाहिरातीचे राज्यातील प्रमुख स्टेशनवरुन प्रत्येक बँडमध्ये प्रस्तावित नमूद दराच्या मर्यादेत समसमान जाहिरात प्रसारण (DAVP) दर	नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत	३० दिवस	१०,००,०००	१,८०,०००	११,८०,०००

६	पॉडकास्ट निर्मिती करणे	विहित ई-निविदा प्रक्रियेव्दारे	शासन निर्णय दि.२३.११.२०२३ मधील संस्थाच्या सुचीमधील संस्थामार्फत विहित कार्यपध्दतीचे अवलंब करुन प्रसिध्दी करणे शक्य होईल. या माध्यमांच्या संस्थेनी निविदेमध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिध्दी करण्याचे प्रस्तावित	नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत	३० दिवस	२५,००,०००	४,५०,०००	२९,५०,०००
	बाह्य माध्यमाव्दारे प्रसिध्दी (प्रदर्शन शाखा)							
१	DGIPR होर्डिंग	दरकरार	महासंचालनालयाकडे उपलब्ध असलेल्या होर्डिग्जव्दारे प्रसिध्दी	अंदाजित रकमेच्या मर्यादेत	३० दिवस	२०,००,०००	३,६०,०००	२३,६०,०००
२	महाराष्ट्रातील जिल्हा व तालुक्याच्या विविध ठिकाणी असलेले होर्डिंग	CBC (DAVP) यादिवरील व दर	As per DAVP- एकाधिकारी उपलब्ध असलेल्या संस्थेकडून काम करुन घेण्याचे प्रस्तावित As per Availability	अंदाजित रकमेच्या मर्यादेत	३० दिवस	१००,००,०० ०	१८,००,०००	१,१८,००,०००
३	राज्यातील (महारेल) रेल्वे स्थानकांवरुन एलईडी / एलसीडी स्क्रीनव्दारे योजनांची प्रसिध्दी	CBC (DAVP) यादिवरील व दर	As per DAVP- एकाधिकारी उपलब्ध असलेल्या संस्थेकडून काम करुन घेण्याचे प्रस्तावित As per Availability	अंदाजित रकमेच्या मर्यादेत	३० दिवस	५०,००,०००	९,००,०००	५९,००,०००

४	एस. टी महामंडळाच्या बस स्थानकांवरील होर्डिंगवरुन योजनांची प्रसिध्दी	CBC (DAVP) यादिवरील व दर	As per DAVP- एकाधिकारी उपलब्ध असलेल्या संस्थेकडून काम करुन घेण्याचे प्रस्तावित As per Availability	नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत	३० दिवस	७५,००,०००	१३,५०,०००	८८,५०,०००
			As per DAVP- एकाधिकारी उपलब्ध असलेल्या संस्थेकडून काम करुन घेण्याचे प्रस्तावित As per Availability					
	समाज माध्यमांव्दारे प्रसिध्दी							
१	सोशल मिडीया (Social Media) (युटयुब इन्स्टाग्राम, फेसबुक आदी)	विहित ई-निविदा प्रक्रियेव्दारे	शासन निर्णय दि. २३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थामार्फत विहित कार्यपध्दतीचे अवलंब करुन प्रसिध्दी करणे शक्य होईल. या माध्यमांच्या संस्थेनी निवेदेमध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिध्दी करण्याचे प्रस्तावित	नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत	३० दिवस	१००,००,०००	१८,००,०००	१,१८,००,०००
२	डिजीटल मिडीया मध्यमांव्दारे प्रसिध्दी (प्रथितयश वेबसाईटवरु	विहित ई-निविदा प्रक्रियेव्दारे	शासन निर्णय दि. २३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थामार्फत विहित कार्यपध्दतीचे अवलंब करुन प्रसिध्दी करणे शक्य होईल. या माध्यमांच्या संस्थेनी निवेदेमध्ये	नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत	३० दिवस	७५,००,०००	१३,५०,०००	८८,५०,०००

	न प्रसिध्दी)		नमूद केलेल्या दराने प्रसिध्दी करण्याचे प्रस्तावित					
	एकूण (ब)					७,५८,००,०००	१,१०,४४,०००	८,६८,४४,०००
	एकूण (अ)+(ब)					८,४६,४९,०००	१,२६,३६,८२०	९,७२,८५,८२०
१	शा.नि. दि. १३.०८.२०२१ नुसार रु. ५.०० कोटी इतक्या रकमेपर्यंतच्या प्रसिध्दी आराखड्यासाठी एकूण खर्चाच्या ४ टक्के (रु. २० लाख) आणि त्यापेक्षा प्रत्येक वाढीव रकमेसाठी २ टक्के (उर्वरित (उर्वरित रकमेवर (रु. ५ कोटी वजा जाता)) प्रमाणे		शासन निर्णय तरतूदीनुसार	माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाला येणारा कार्यालयीन उपकरणावरील खर्च, सॉफ्टवेअर, तात्पुरता मनुष्यबळावरील खर्च, संशोधन खर्च वाहतूक खर्च, इतर किरकोळ खर्च		२६,९२,९८०	-	२६,९२,९८०
एकूण खर्च (अ+ब)						८,७३,४१,९८०		९,९९,७८,८००